नि. दि. दा. क्र.६३/२०१५
शंभू वि.. कल्याण

नि.क्र. ११२

**दि. २४.११.२०२५.**

**प्रतिवादीचा साक्षीदार क्र. १ कल्याणराव यांचा उलटतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री बी.बी.. नंदागवळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

माझे शिक्षण इ. २री पर्यंत झाले आहे. मला थोडे लिहीता वाचता येते. माझे म्हणण्याप्रमाणे जबाबदावा दाखल करण्यात आला आहे. माझे वडीलांना स.नं. ७२ मध्ये ७ हे. शेतजमीन होती. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ७२ चा गट क्र. १०७ देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांच्या स.नं.७२ च्या संपूर्ण जमीनीला गट क्र. १०७ देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी विक्री करुन दिल्यानंतर राहिलेल्या शिल्लक जमीनीमध्ये वाटणी करुन आम्हाला जमीन देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१०७ मध्ये १० एकर ३६ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०७ मधील १० हे. ३६ आर पैकी ७ हे. ६ आर जमीनीच्या वाटण्या आमच्या वडीलांनी करुन दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, ७ हे. ६ आर सोडून शिल्लक राहीलेली जमीन वडीलांनी विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व त्यांचे वारस यांनी आत्माराम माधव शिंदे यांना कोणतीही जमीन विक्री केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०७ क्षेत्र १० हे. ३६ आर जमीनीच्या पुर्वेला गट क्र. १०८ मधील प्रल्हाद आलूरे व भिमराव आलुरे यांची जमीन, पश्चीमेला दापक्याळ गावाची शिव, उत्तरेला वडवळ ना. शिव, दक्षीणेला गट क्र. १०६ ची जमीन आहे. गट क्र. १०६ मध्ये शिवाजी विलास शिंदे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी शिंदे यांच्या बाजुला गट क्र. १०७ मधील ७ हे. ६ आर जमीन आम्हा भावांना

वाटून दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटणीनुसार आम्ही आता जमीनीमध्ये ताब्यात आहोत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या वाटणीची जमीन झाल्यानंतर उत्तरेला महेबूबबी यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, महेबूबबी यांच्या जमीनीच्या उत्तेरला रतन पुट्ठेवाड यांची जमीन आहे. रतन पुट्ठेवाड यांच्या उत्तरेला वादीची जमीन आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, वादीची ६ एकर २ गुंठे जमीन आहे व माझी देखील जमीन आहे. मी माझी तेथे शेतजमीन आहे हे दाखविण्याकरीता ७/१२ उतारा व इतर दस्त दाखल करु शकतो.

हे म्हणणे खरे आहे की, आत्मराम शिंदे हे आमच्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आत्मराम शिंदे यांच्या ८६ गुंठेच्या पुर्वेला बाबुराव भोसले, पश्चीमेला देवीदास बापन्ना शिंदे यांची जमीन आहे, दक्षीणेस माधवराव बापन्ना शिंदे यांची जमीन, उत्तरेस देवीदास बापन्ना शिंदे यांची जमीन आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो त्या जमीनीच्या पश्चीमेस माझी गट क्र. १०९ मधील जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते बापन्ना मारोती शिंदे यांच्याकडून नरहारी रामा सुर्यवंशी यांनी ८५ गुंठे जमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, नरहारी रामा सुर्यवंशी यांच्याकडून ती जमीन आत्माराम शिंदे यांनी खरेदी केली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, ती जमीन गट क्र. ११० मधील आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याची नोंद गट क्र. ११० मध्ये न होता, गट क्र. १०७ मध्ये झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०७ मधील आत्माराम शिंदे यांच्या नावाने ८६ आर जमीनीची नोंद ७/१२ वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, जरी तशी नोंद असली तरी आत्माराम यांचा ताबा गट क्र. ११० मध्ये आहे. हे मला सांगता येणार नाही की, गट क्र. १०७ मध्ये

आत्माराम यांचे नाव चुकीने झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे भावाने त्या नोंदीबाबत कोणतेही अपील किंवा हरकत नोंदविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी शंभू आलुरे यांना गट क्र. १०७ मधील ६ एकर २ गुंठे जमीन खरेदीखत क्र. ११५२/१९८० नुसार जमीन विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तो गट क्र. १०७ चा उत्तरेचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझे वडीलांनी शंभू आलुरे यांना गट क्र. १०७ मधील २ एकर २ गुंठे जमीन विक्री केली हाती. हे म्हणणे खरे नाही की, १९८७ च्या खरेदीखतानुसार त्या २ एकर २ गुंठे जमीनीवर शंभू आलुरे हे ताब्यात आहेत. हे मला माहीत नाही की, त्या खरेदीखताची माहीती झाल्यानंतर फेरफारबाबत कोणतीही नोंद नसल्यामुळे सन २०१५ मध्ये फेरफाराबाबतचा अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या फेरफार होण्याबाबत मी हरकत घेतली होती. हे मला माहीत नाही की, फेरफार मंजूर झाला होता किंवा नाही व त्यावर मी अपील केले होते.

प्रश्न- एस.डी.ओ. यांनी फेरफार क्र. ११५७ नामंजूर केला होता.

उ.- एस.डी.ओ. शेरे मॅडम यांनी माझा फेरफार मंजूर केला होता.

हे म्हणणे खरे आहे की, आमच्या वडीलांनी फक्त शंभू आलुरे यांना जमीन विक्री केली आहे इतर कोणालाही विक्री केली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, शंभु आलुरे यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते व त्यानुसार त्यांचा फेरफार मंजूर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या आदेशाच्या विरुध्द आम्ही कोठेही अपील केले नाही.

प्रश्न- दाव्यातील परि.क्र. ६ वर तुम्ही तुमच्या जबाबदाव्यात कांहीही उत्तर दिले नाही.

नि. दि. दा. क्र.६३/२०१५
शंभू वि.. कल्याण

नि.क्र. ११२

उ. साक्षीदार कांहीही सांगत नाही.

प्रश्न- दाव्यातील परि.क्र.६ मधील मजकूर तुम्हाला मान्य आहे, त्यामुळे तुम्ही कोणतेही उत्तर दिले नाही.

उ.- साक्षीदार कांहीही सांगत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीनीच्या ताब्याला मी हरकत, अडथळा केला होता.

प्रश्न- तुम्ही वादीचा दावा जमीनीवरील ताबा सतत नाकारत आहात.

उ- ताब्याला आम्ही हरकत करत नाही, तेथे माझा ताबा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझा ताबा आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रात मी संपूर्ण खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमीनीशी माझा कोणताही संबंध नाही त्यामुळे वादी यांना बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.11.24 13:05:48 +0530

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. २४/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर